स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी
सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा प्रारंभीक आराखडा

“सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य : एक समाजशास्त्रीय अध्ययन”

-:: संशोधक ::-

चव्हाण संदीप उत्तमराव

एम.ए. (समाजशास्त्र), बी.एड.

-:: मार्गदर्शक ::-

डॉ.सुखदेव गोविंदराव चव्हाण

सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
माधवराव पाटील आर्ट, कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज पालम
जि.परभणी

-:: संशोधन केंद्र ::-

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सन – 2023

“सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य: एक समाजशास्त्रीय अध्ययन"

प्रस्तावना:

भारतातील श्रेष्ठ महिलांचे समाज कार्य नव्या पिढीला माहीत व्हावे, तसेच त्यांच्या उत्तम चरित्रांचे व उत्कृष्ट कार्याची माहीती व्हावी हा उद्देश प्रस्तुत संशोधन विषय "सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्यः एक समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयाची निवड केली आहे.

अनेक कर्तबगार महिलांचा वारसा भारताला, महाराष्ट्र राज्याला लाभला आहे. त्यानी आपल्या आयुष्यातील समस्यांना तोंड देत संघर्ष करीत यशस्वी झाल्या आहेत. त्यांनी स्वतः खचुन न जाता सामाजिक कार्य व सामाजिक सुधारणा घडवून आणल्या यशाचे शिखर गाठले. आपल्या सारखे दुःख दुसऱ्याच्या वाटेत येवू नये म्हणून दुसऱ्या व्यक्तीच्या भक्कम आधारवड बनल्या आहेत. असेच व्यक्तीमत्व. सिंधुताई सपकाळ यांचे आहे.

स्त्रीने फक्त कुटूंबा पुरतेच 'चुल आणि मुल’ इतपर्यंतच मर्यादीत राहावे ही परंपरागत पुरुष प्रधान समाजाची मानसिकता असते. मोठे धाडस आणि न डगमगता आव्हानाना तोंड देण्याची शक्ती प्रत्येक स्त्री मध्ये सुप्त असते. हे सिंधुताई सपकाळ यांचे कार्य अभ्यासतांना जाणवते. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा गौरव देशात तसेच विदेशात देखील होताना दिसतो. त्यांनी वैयक्तीक संघर्ष याचा गवगवा, दुःख न करता गरजू, अनाथ, दुबळया उपेक्षीताना आधार दिला त्यातूनच त्या "अनाथाची माई" ठरल्या. त्याचे चरित्र प्रत्येक नागरिकांना प्रेरणादायी आहे यांची ओळख सर्वांना व्हावी या उद्देशाने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

सिंधुताई सपकाळ हया एक भारतीय समाज सुधारक आहेत. "त्यांना 'अनाथाची आई" म्हणून ओळखले जाते. भारतातील अनेक अनाथ मुलांचे पालन पोषण त्यांनी स्वतःच्या मुला प्रमाणे केले. त्यांनी अनेक खडतर प्रसगांना तोंड देत हजारों अनाथ मुलांचा सांभाळ केला आहे तसेच स्वकीयांच्या प्रेमाला पारखे झालेल्या, समाजाने झिडकारलेल्या अशा अनेक निरपराध निराधार लेकरांना मायेच्या स्पर्षाने,

जिव्हाळ्याच्या ओलाव्याने आपलेसे करणाऱ्या सिंधुताई सपकाळ म्हणजे अनाथांची माता.

सन 2016 मध्ये, सिंधुताईना सामाजिक कार्यासाठी ‘डी. वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेनॉलॉजी अँड रिसर्च’ तर्फे साहित्यात डॉक्टरेट पदवी देण्यात आली. भारतीय स्त्रिया हया अत्यंत कठीण परिस्थितीवर करुन मात यशस्वी होतात यांचे मूर्तीमंत उदाहरण सिंधुताई सपकाळ आहेत.

सिंधुताई सपकाळ यांचा संक्षिप्त परिचय

पूर्ण नाव सिंधुताई सपकाळ त्याना 'अनाथाची माई' हे नाव समाजाने बहाल केले आहे. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ ला झाला. त्यांचे जन्मस्थान वर्धा महाराष्ट्र आहे. त्याच्या वडीलांचे नाव अभिमानजी साठे होते. त्यांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्या सोबत झाला. ते सिंधुताई पेक्षा २६ वर्षांनी मोठे होते. त्यांच्या कुटूंबाचा व्यवसाय गुरे ढोर पाळणा-या गरीब कुटुंबात झाला, घरच्या गरिब परिस्थितीमुळे त्यांना जास्त शिक्षण घेता आले नाही. लग्नानंतर त्यांना अनेक संकटाचा सामना करावा लागला,

*** महिलांच्या शोषणा विरुद्ध लढा :**

सिंधुताई माहेरी असताना त्यांनी वन विभाग आणि जमिनदार यांच्या विरुद्ध लढा दिला आणि जिंकला. पण त्या नंतर त्यांचे आयुष्य अधिक खडतर झाले. वयाच्या 20 व्या वर्षी जेव्हा त्या गरोदर राहील्या, तेव्हा जमिनदाराने अफवा पसरवली की हे मूल दुसऱ्यांचे आहे. नवऱ्याने चरित्रावर संशय घेवून घराबाहेर काढले. त्यांनी मुलीला गाईच्या गोठ्यात जन्म दिला. सिंधुताई पोटाची खळगी भरण्यासाठी रेल्वे स्थानकावर, बस स्टँडवर भिक मागितली स्वत:चे अस्तीत्व टिकून ठेवले.

अमरावती जिल्हयात वाघ्र प्रकल्पामुळे जवळपासची ८४ गावे रिकामी करण्यात आली. या आदिवासींच्या पुर्नवसनांसाठी सिंधुताईने संघर्ष केला. त्यांच्या संघर्षाला वनमंत्र्याने मान्यता देवून आदीवासीचे पुर्नवसन करण्यात आले.

त्यांनी स्वत:ची मुलगी 'श्री दगडूशेठ हलवाई, पुणे महाराष्ट्र' ट्रस्टला दत्तक दिली. बऱ्याच वर्षानंतर सिंधुताईनी चिखलदरा येथे अनाथ आश्रम बांधले त्यात त्यांनी 1200 मुलांना दत्तक घेतले. जे त्यांना, माई म्हणून संबोधतात. त्यांना या कार्यासाठी डॉ.

बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाला. अनेक बेघर महिलांना आधार दिला. अनेक व्यासपीठावरुन त्यांनी भाषण दिले. त्यातील मानधन ते अनाथ उपेक्षीत वंचितासाठी वापरत असत. अशा प्रकारे सिंधुताई सपकाळ यांचे निधन ४ जानेवारी २०२२ मध्ये झाले. त्यांना एकूण ७३ वर्षे आयुष्य लाभले.

*** सिधुताई संचालित संस्था**

- बाल निकेतन हडपसर पुणे.
- सावित्रीबाई फुले मुलींचे वस्तीगृह चिखलदरा.
- अभिमान बालक भवन, वर्धा.
- गोपिका गाई रक्षण केंद्र, पुणे.
- वर्धा (गोपालन) सप्तसिंधू महिला आधार बालसंगोपन व शिक्षण संस्था, पुणे.
- ममता बालसदन, सासवड अनेक ठिकाणी आहेत.

*** चित्रपट**

अनंत महादेव दिगदर्शित २०१० मध्ये "मी सिंधुताई सपकाळ" हा चित्रपट सत्य कथेवर आधारित आहे. तो ५४ व्या लंडन चित्रपट महोत्सवात दाखवण्यात आला.

*** पुरस्कार**

- १९९६ मध्ये तिला अडॉप्टिव्ह मदर अवॉर्ड मिळाला.
- २०१० मध्ये अहिल्याबाई होळकर पुरस्कार (महाराष्ट्र राज्याकडून) मिळाला.
- २०१२ मध्ये त्यांनी रिअल वारस पुरस्कार जिंकला.
- २०१३ मध्ये, मदर तेरेसा यांना सामाजिक न्यायासाठी मदर तेरेसा पुरस्कार मिळाला.
- २०१३ मध्ये आयनिक मदरला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.
- २०१४-२०१५ मध्ये अहमदिया मुस्लिम शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- पद्मश्री पुरस्कार – २०२१ मिळाला.
- त्यांना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

सिंधुताई सपकाळ यांचे जिवन प्रत्येक भारतीय स्त्रिला प्रेरणा देणारे आहे म्हणून हा विषय संशोधना साठी निवडण्यात आला आहे.

*** सामाजिक संशोधनाचे महत्व -**

आपल्या महाराष्ट्राला संताची, विचारवंताची आणि समाज सुधारकांची उज्वल अशी परंपरा लाभली आहे. स्वातत्र्योत्तर काळातही असे ऋषीतुल्य समाज- समर्पित व्यक्तीमत्व महाराष्ट्रात आहेत. त्यातील प्रमुख नावांपैकी सिंधुताई सपकाळ यांचे कार्य आणि कर्तृत्व खुप प्रेरणादायी आहे. या संशोधन विषयाचे महत्व पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. अतिशय प्रतिकुल परिस्थितीशी झुंज देवून आपल्या आयुष्याची नव्याने उभारणी करणाऱ्या सिंधुताई सपकाळ याचे चरित्र प्रत्येक उपेक्षित संघर्ष करणाऱ्या व्यक्तीला प्रेरणादायी ठरेल.

२. या संशोधन विषयाच्या निमीत्ताने स्वतःचे स्वप्न साकार करण्यासाठी लागणारी जिद्द सहनशिलता संघर्ष क्षमता प्रत्येक भारतीय नागरिकाला उर्जा देणारी आहे म्हणून हा विषय अभ्यासणे गरजेचे आहे.

३. महाराष्ट्रातील आदिवाशीच्या हक्कांसाठी अनेक लढे झाले आहेत. त्यामध्ये सिंधुताई सपकाळ यांचे उल्लेखनिय कार्य समाजासमोर आणने.

४.एक साहित्यीक, उत्कृष्ट नैसर्गिक वक्ता म्हणून त्या प्राख्यात होत्या. त्यांच्यात नैसर्गिक प्रतिमा होती. तिची जवळून ओळख होण्याच्या दृष्टीने हा संशोधन विषय महत्वाचा ठरतो.

५. मदर टेरेसा प्रमाणे सिंधुताई सपकाळ यांचे अनाथा प्रती असलेले कार्य अत्यंत गौरवास्पद आहे. त्यामुळे कित्येक जिवनात यशस्वी होता आले. या कार्याचा गौरव देशाने पदमश्री देवून केला. या कार्याचा जवळून आढावा घेण्याच्या दृष्टीने, त्यांच्या संस्थेचे कार्य अभ्यासण्यासाठी हा विषय महत्वाचा आहे. म्हणून संशोधना करिता या विषयाची निवड करण्याचे योजिले आहे.

संशोधन विषयाच उद्देश -

संशोधन विषयाच्या निश्चीतीनंतर त्या संशोधन विषयाचे काही उद्दिष्टये ठरविली जातात. म्हणून येथे "सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य: एक समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय संशोधना करीता निवडण्यात आला आहे. या संशोधना करीता पुढील उद्देश निश्चीत करण्यात आले आहे.

1) सिंधुताई सपकाळ यांचा पुर्व इतिहास जाणून घेण

2) सिंधुताई सपकाळ यांच्या कार्याची जडण-घडण, व्यक्तीमत्वाचे विविध पैलूचा अभ्यास करणे.

३) सिंधुताई सपकाळ यांनी दिलेल्या आदिवासी चळवळीतील योगदानाचे अध्ययन करणे.

४) सिंधुताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

५) सिंधुताई सपकाळ यांनी अनाथ मुलांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

६) सिंधुताई सपकाळ यांनी अनाथ बालकाचे संगोपन, शिक्षण, सरंक्षण, पुर्नवसन, कार्याचे अध्ययन करणे.

*** संशोधनाची गृहीततके**

सामाजिक संशोधनात गृहीतकृत्यांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. एकदा समस्यासुत्रणाव्दारे अध्ययन विषय निश्चीत झाल्या नंतर त्या अध्ययन विषयाचे संभाव्य उत्तरे संशोधक आपल्या निरीक्षणाव्दारे, अनुभवाव्दारे अभ्यासाद्वारे मांडणी करतो ही मांडणी संशोधकास दिशादर्शक असते. म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाचे गृहीतके पुढील प्रमाणे आहेत.

- सिंधुताई सपकाळ यांच्या सामाजिक, शैक्षणिक, अनाथ बालकाचे संगोपन व पुर्नवसन इ. कार्याची माहिती भावी पिढीस महत्वपुर्ण ठरेल.
- सिंधुताई सपकाळ यांची संघर्ष गाथा भावी पिढीसाठी प्रेरणास्त्रोत ठरेल.
- सिंधुताई सपकाळ यांचे जीवनकार्य व त्यांची नावलौकीकता, त्यांचे बहुआयामी व्यक्तीमत्व समाजासाठी प्रेरणास्त्रोत आहे.
- महाराष्ट्रात दुर्गम भागातील उपेक्षित आदीवाशीच्या हक्कांसाठी सिंधुताई सपकाळ यांनी अत्यंत भरीव, कार्य केलेले आहे.
- सिंधुताई सपकाळ यांच्या व्यक्तीमत्व बहुआयामी त्या कवी, साहित्यीक, प्रतिभा संपन्न वक्ता संवेदनशील, मानवतावादी समाज सुधारक आहेत.
- सिंधुताई सपकाळ यांनी स्थापन केलेल्या संस्थानी अनेक अनाथ मुलांना घडविले आहे.

- सिंधुताई सपकाळ यांच्या संस्था मार्फत आदिवासी अनाथ मुलांसाठी नियमीत पणे संवेदनशिल मानवतावादी कार्य घडुन आलेले आहेत.
- अशा व्यक्तिमत्वातून व त्यांच्या कार्याच्या अध्ययनातून समाजाची बांधीलकी असणारी पिढी तयार होण्यासाठी नक्कीच मदत होईल.

*** संशोधनाचे अध्ययन क्षेत्र**

संशोधनाचा विषय निश्चीत केल्यानंतर अध्ययन हे कोणत्या क्षेत्रात करायचे हे ठरविले जाते. याठिकाणी संशोधनाचा विषय हा "सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य: एक समाजशास्त्रीय अध्ययन" हा निश्चीत केला आहे त्यामुळे सिंधुताईचे संपूर्ण जिवन चरित्र, त्याचे कार्य त्याच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू अभ्यासले जाणार आहेत.

*** संशोधनाच्या मर्यादा**

प्रस्तुत संशोधनाचे अध्ययन क्षेत्र हे सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य असल्यामुळे या संशोधनातील निष्कर्ष इतर संशोधनास लागू होवू शकणार नाहीत. हे संपूर्ण अध्ययन सिंधुताई सपकाळ यांच्या व्यक्तीमत्वा पुरतेच मर्यादित आहे.

संशोधन आराखडा

संशोधनामध्ये संशोधकाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधन आराखडा अत्यंत उपयुक्त आहे. संशोधन कार्यातील वेळ पैसा, श्रम यांचा अपव्यय टाळण्यासाठी आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी संशोधन आराखडा उपयुक्त ठरते 'प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात येणार आहे.

*** तथ्य संकलन तंत्र व पध्दती**

सामाजिक संशोधन करताना तथ्य संकलन तंत्राचा वापर करावा लागतो. अन्य नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच सामाजिक शास्त्रातही ज्ञानेंद्रीयांच्या आधारे होणारा बोध व निरीक्षण हाच तथ्यप्राप्तीचा आधार आहे. संशोधन विषयाकरीता तथ्य संकलनाच्या विविध प्राथमिक तथ्य संकलना मध्ये सिंधुताई सपकाळ सोबत असणा-या व्यक्तीच्या मुलाखती तसेच दुय्यम तथ्य संकलनामध्ये सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनावर लिखीत चरित्रग्रंथ, लेख, प्रकाशित बातम्या, संदर्भग्रंथ, माहिती प्रसारण संकेत स्थळाचाही उपयोग केला आहे.

*** तथ्याचे विश्लेषण व निर्वाचन**

व्यष्टी अध्ययन पद्धती तसेच तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी आशय विश्लेष्ण पद्धतीचा उपयोग केला आहे. तथ्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून अचूक निकर्ष काढण्यात येणार आहेत.

*** अहवाल लेखन**

संशोधन अहवाल ही सामाजिक संशोधनातील शेवटची पायरी आहे. संशोधन अध्ययनातील संपादीत तथ्य सामग्रीच्या पुराव्याव्दारे संशोधन कर्ता जे स्पष्टीकरण करतो त्या आधारे संशोधनाचा अहवाल तयार केला जातो. संशोधन अहवालात प्रस्तावना अध्ययन क्षेत्र गृहीतके तथ्यसंकलन, तथ्याचे विश्लेषण, निष्कर्ष, परिशीष्टये संदर्भ सुची तयार करण्यात येईल.

*** प्रकरणाची रुपरेषा**

“सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य: एक समाजशास्त्रीय अध्ययन” या विषयाची वस्तुनिष्ठ मांडणी करण्याच्या दृष्टीने संशोधन प्रकरणाची पुढील प्रमाणे मांडणी करण्यात येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व साहित्य सर्वेक्षण:

यात सिंधुताई सपकाळ यांचे बालपण, शिक्षण विवाह, संघर्षमय जिवन आदीवाशी चळवळीतील केलेले कार्य, अनाथ मुला-मुलींसाठी केलेले कार्य, पुरस्कार ते निधना पर्यंत संपूर्ण जिवनकार्याचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच त्यांच्यावर लिहलेल्या संदर्भ साहित्याचे अध्ययन केले जाणार आहे.

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती:

संबंधित प्रकरणामध्ये संशोधन विषयाची निवड, त्याचे उद्देश, गृहीतकृत्ये, संशोधन आराखडा, तथ्य संकलन पद्धती तथ्याचे विश्लेषण तथ्याचे वर्गीकरण व विश्लेषण निष्कर्षा पर्यंतची रुपरेषा देण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : सिंधुताई सपकाळ यांचा जिवन संघर्ष

या प्रकरणामध्ये त्यांच्या प्रतिकुल परिस्थितीवर मात केलेल्या अनुभवाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : प्रस्तुत प्रकरणात सिंधुताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

- आदिवासी समाजांला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी केलेले कार्य
- गो-मातेचे रक्षण आणि संवर्धन संबंधीचे कार्य
- व्याघ्र प्रकल्पा दरम्यान ८४ आदिवाशी गांवाचे निर्वासन करुन परत त्यांना त्यांच्याच गावात पुर्नस्थापित करण्यात आले.
- स्त्रींयाच्या अधिकारासोबतच लैंगिक समानतेसाठी केलले प्रयत्नांचा आढावा घेणे.

प्रकरण पाचवे : प्रस्तुत अध्ययनाच्या या प्रकरणात सिंधुताई सपकाळ यांनी अनाथ मुलांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे

- सिंधुताई ने अनाथ आणि परित्यक्त मुलांसाठी अनेक घरे स्थापन केली आहेत, त्यांना सुरक्षित आणि पालनपोशन करणारे वातावरण प्रदान केले आहे.
- व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी राबविलेले कार्यक्रम तसेच कौशल्य विकसित करण्यासाठीच्या मोहिमांचे स्पष्टीकरण करणे.

प्रकरण सहावे - या प्रकरणांमध्ये सिंधूताई सपकाळ यांच्या एकूण मानवतावादी कार्याचा आढावा घेऊन निष्कर्ष तथा मूल्यमापन करण्याचे निश्चीत केले आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

- सिंधुताई सपकाळ, (२००६), "मी वनवासी", रिया पलिकेशन, डिस्ट्रिब्युटर्स, पुणे
- महाजन डी.बी., “अनाथाची आई" (२०१८) तीर्थरूप पब्लिकेशन, पुणे.
- www.shindutuisapkut. (संकेतस्थळ वरील माहिती)
- आगलावे प्रदिप, (२०१०), 'सामाजिक संशोधन पद्धती' सारनाथ प्रकाशन नागपूर.
- कवि माधवी (२०१०), - ३०१ श्रेष्ठ महिला' (संक्षिप्त चरित्र आणि विचारधन), विद्याभारती प्रकाशन लातूर.

- स्वामी.व्ही. एन. (२०१३), 'महाराष्ट्रातील समाज सुधारक संत, साहित्यिक आणि थोर विचारवंत विद्याभारती प्रकाशन, लातूर.
- कठारे अनिल (२०१५), "भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास", प्रकाशन, जळगाव.
- पवळे टी. एस. कांबळे सी-टी. (२०११), "भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा"
- शहा धनश्याम, चिकटे प्राची (२०११), "भारतातील सामाजिक चळवळी", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
- लाल एवं जैन (२०१०), 'महान व्यक्तित्व' उपकार प्रकाशन आगरा-2.
- श्री. मधुसुदन त्रिपाठी (२०१०), "भारतमे मानवाधिकार ओमेगा पब्लिकेशन, नई दिल्ली. (बच्चोक अधिकार - २९६)
- चतुर्वेदी मधुमुकुल, (2003), "भारतीय संविधान में व्यक्ति की गरिमा एवं मानवाधिकार" राज पब्लिकेशन, जयपूर.
- माने लक्ष्मण (२०१०), 'उपरा', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
- बोधनकर सुधीर, अलोणी विवेक (२००१), "सामाजिक संशोधन पद्धती" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- घाटोळे रा.ना. (2000), 'सामाजिक संशोधन तत्त्वे व पध्दती श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

संशोधक | मार्गदर्शक

चव्हाण संदीप उत्तमराव
संशोधक विद्यार्थी
सामजिक शास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

डॉ.सुखदेव गोविंदराव चव्हाण
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
माधवराव पाटील आर्ट, कॉमर्स
आणि सायन्स कॉलेज पालम जि.परभणी